सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २७ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## कर्नाटकात नवा फॉर्म्युला!

# डी.के शिवकुमार CM तर ४ उपमुख्यमंत्री बनणार; नाव फायनल, घोषणा बाकी?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७बंगळुरू-** कर्नाटकात सत्ता परिवर्तन निश्चित झाले आहे. विद्यमान मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्यानंतर डी.के शिवकुमार मुख्यमंत्री बनण्याची शक्यता आहे. त्यातच नवा फॉर्म्युला समोर आला आहे. नव्या सरकारमध्ये एक, दोन नव्हे तर तब्बल ४ उपमुख्यमंत्री असतील. त्यांची नावेही समोर आली आहेत. सरकारमध्ये मागासवर्गीय, ओबीसी, लिंगायत, अल्पसंख्याक या गटातून प्रत्येकी एक चेहरा उपमुख्यमंत्री बनवला जाण्याची शक्यता आहे.

माहितीनुसार, संभाव्य उपमुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत दलित कोट्यातून जी. परमेश्वर आणि प्रियांक खरगे, ओबीसी कोट्यातून यतींद्र सिद्धरामय्या, लिंगायत कोट्यातून एम.बी पाटील आणि ईश्वर खंड्रे, अल्पसंख्याक कोट्यातून केजे जॉर्ज, यूटी खादर आणि जमीर यांची नावे चर्चेत आहेत.

कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चा सुरू असताना उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि मुख्यमंत्री सिद्धारामय्या गुरुवारी ब्रेकफास्ट बैठक घेणार आहेत. यामुळे राज्यातील राजकारणातील चर्चांना अधिकच जोर आला आहे. ही बैठक गुरुवारी (२८ मे) बंगळूरमधील मुख्यमंत्र्यांच्या 'कावेरी' या शासकीय निवासस्थानी होणार आहे. सूत्रांनुसार बैठकीनंतर दोन्ही नेते संयुक्त पत्रकार परिषद घेऊन



नेतृत्वबदलाबाबत सुरू असलेल्या चर्चांवर स्पष्टीकरण देऊ शकतात. डिसेंबर २०२५ मध्ये मुख्यमंत्री सिद्धारामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार यांच्यात बहुचर्चित 'ब्रेकफास्ट डिप्लोमसी' बैठक झाली होती. ही बैठक शिवकुमार यांच्या निवासस्थानी झाली होती. त्यावेळी काँग्रेस नेतृत्वाने मुख्यमंत्रिपदाची अदलाबदल आणि सत्तावाटपाच्या चर्चा सुरू असताना एकतेचा संदेश दिला होता.

दरम्यान, राहुल गांधी यांनी सिद्धारामय्या यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास सांगितले आहे, जेणेकरून शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवता येईल. काँग्रेस नेतृत्वाने सिद्धारामय्या यांना केंद्रीय राजकारणात मोठी भूमिका आणि त्यांचे पुत्र यतींद्र सिद्धारामय्या यांना उपमुख्यमंत्रीपदासोबतच प्रमुख खात्यांचे आश्वासन दिले आहे. राजीनामा देण्यापूर्वी सिद्धारामय्या मंत्री आणि आमदारांसोबत स्नेहभोजन बैठक घेऊ शकतात. गुरुवारी काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि रणदीप सिंग सुरजेवाला यांच्या उपस्थितीत औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. शिवकुमार यांच्या समर्थकांनी ते पुढील मुख्यमंत्री झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पोस्टर लावण्यास आणि सोशल मीडियावर संदेश शेअर करण्यास सुरुवात केली आहे. परंतु पक्षाने अद्याप नेतृत्व बदलाबाबत अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.

# महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सर्व जागा लढवणार

## जागावाटपही जवळपास निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई-** विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महायुतीत रस्सीखेच सुरू असतानाच महाविकास आघाडीनेही आता या निवडणुकीसाठी कंबर कसल्याचं दिसून येतंय. महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सर्व म्हणजे १७ जागा लढवणार आहे. त्यामध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा लढवणार असून त्याखालोखाल ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी जागा लढवणार आहे. येत्या १८ जून रोजी विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे.

या १७ जागांपैकी काँग्रेस सात ते आठ जागा लढणार आहे. तर ठाकरेंची शिवसेना पाच ते सहा जागा लढणार आहे. त्याचवेळी शरद पवारांची राष्ट्रवादी तीन ते चार जागावर लढणार असल्याची



माहिती आहे.कोण कुठल्या जागांवर लढणार याविषयीचा निर्णय येत्या दोन ते तीन दिवसांत घेतला जाणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, महायुतीतल्या नाराजीचा फायदा उठविण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून सर्व जागा लढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झाला नसला तरी ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे तो ती लढवेल अशी माहिती आहे. त्यानुसार चंद्रपूर, सांगली-सातारा या ठिकाणी काँग्रेसची ताकद आहे. तर परभणी हिंगोलीमध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्यानुसार जागावाटप होणार असल्याची माहिती आहे.अमरावती विधान परिषद हि काँग्रेस लढविणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र या ठिकाणी अजून पर्यंत तगडा उमेदवार मिळत नसल्याचे बोलल्या जात आहे.

# अजितदादांच्या अपघाताला ४ महिने झाले, 'CID'चा तपास कुठे आला? तुम्ही दिलेला शब्द कुठे गेला?

## रोहित पवारांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाला उद्या ४ महिने पूर्ण होत आहेत.या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सवाल केले आहेत. अधिवेशन काळात मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत, सीआयडी चौकशीवर पवारांनी संताप व्यक्त केला. तसेच सीआयडीला 'कुचकामी यंत्रणा' म्हटले आहे.

अजितदादांच्या अपघाताला उद्या ४ महिने होतील. अधिवेशनात बोलताना तुम्ही गुन्हेगारांना पाताळातून शोधून काढण्याचा, सीबीआय चौकशीबाबत अमित शहा यांच्याकडे पाठपुरावा करण्याचा, तसेच कर्नाटकात नोंद झालेली झिरो ऋखठ महाराष्ट्रात वर्ग करून घेण्याचा शब्द दिला होता. आपण शब्द देऊन अडीच महिने होत आले, या अडीच महिन्यात काय कार्यवाही झाली हे आपणच सांगावे, असेही रोहित पवार यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.रोहित पवार म्हणाले, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत गेल्या अडीच महिन्यात आपल्या असंख्य बैठका झाल्या असतील, त्यामध्ये सीबीआय चौकशीचा मुद्दा आपण घेतला नसेल, तर आज होणाऱ्या बैठकीत तरी हा मुद्दा आग्रहाने घ्या. राष्ट्रवादीचे मंत्री उपस्थित असतील तर त्यांनी देखील पाठपुरावा करायला हवा. मित्र हयात असला किंवा नसला तरी मित्रासाठी मैत्री नेहमीच जिवंत असते, ही सर्वसामान्य जनतेची भावना असते. राजकीय लोकांसाठी ही भावना वेगळी आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही, असा टोला रोहित पवार यांनी लगावला.

राहिला प्रश्न सीआयडी चौकशीचा, तर



सीआयडी काय करते नेमकं हेच कळत नाही. गेल्या २८ तारखेला सीआयडी कार्यालयात गेलो असता तपास अधिकारीच उपस्थित नव्हते. त्यांना मेल करून अनेक नवे पुरावे दिले, पत्र स्वतः जाऊन दिले, तरी त्यांचा काहीही प्रतिसाद नाही. अजितदादांच्या अपघात प्रकरणात सीआयडी करत असलेला तपास बघता, सीआयडीसारख्या कुचकामी यंत्रणा म्हणजे बिनकामाचे ओझेच म्हणावे लागेल, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

# हर्षवर्धन सपकाळ यांना राज्यात फिरू देणार नाही

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर-** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात अत्यंत अश्लाघ्य शब्दांत टीका केली आहे. त्यातून त्यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांनी आपली भाषा सुधारली नाही, तर भाजप कार्यकर्ते त्यांना महाराष्ट्रात कुठेही फिरू देणार नाहीत, असा इशारा भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. यावेळी त्यांनी महायुतीच्या विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपाची घोषणा उद्या किंवा परवा होईल असेही सांगितले.

विरोधी पक्षांनी मंगळवारी चांदवड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित केला होता. यावेळी भाषण करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत तिखट शब्दांत आगपाखड केली होती. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात बोलताना



त्यांच्या या टीकेचा समाचार घेतला. ते म्हणाले, ते म्हणाले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेली टिप्पणी अत्यंत अश्लिल आहे. त्यातून हर्षवर्धन सपकाळ यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांची बुद्धी बुद्धीहिन झाली आहे. विरोधी बाकावर असल्यामुळे सपकाळांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे अशी विधाने करून ते गावागावात व समाजात तेढ निर्माण करणे, वाद निर्माण करणे व समाजातील चांगले वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी असे विधान करून खूप मोठी चूक केली आहे. भाजपचा कार्यकर्ता हर्षवर्धन सपकाळ यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही. ते सुधारले नाही तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणे सोडले पाहिजे. त्यांनी चांगल्या भाषेत बोलले पाहिजे. त्यांची नीच व नालायक टीकेला आम्ही सोडणार नाही.

# भोंदू अशोक खरातच्या 'लीला' आता पडद्यावर

## दीपाली सय्यद यांची महत्त्वाची भूमिका, रुपाली चाकणकर साकारणार असल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई-** अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजवणाऱ्या भोंदू अशोक खरात व त्याच्या कारनाम्यांवर आता चित्रपट येणार असल्याची माहिती आहे. या चित्रपटात सत्ताधारी शिवसेनेच्या पदाधिकारी दीपाली सय्यद प्रमुख भूमिकेत दिसून येणार आहेत. त्यामुळे त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा या प्रकरणातील एक कथित प्रमुख संशयित असणाऱ्या रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेत दिसणार काय? अशी चर्चा सिनेरसिकांत रंगली आहे.

भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण व अनेकांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी त्याचे महिलांसोबतचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. प्रस्तुत प्रकरणात नाव आल्यामुळे



रुपाली चाकणकर यांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद व त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या पार्श्वभूमीवर आता अशोक खरातच्या कारनाम्यांवर एक मराठी चर्चा येणार आहे. शिवसेनेच्या पदाधिकारी तथा अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना ही माहिती दिली आहे.


दीपाली सय्यदने दिली चित्रपटाची माहिती

दीपाली सय्यद याविषयी बोलताना म्हणाल्या, बिग बॉस स्पर्धेतून बाहेर आल्यानंतर मला

# शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

## ब्रीच कँडीमध्ये वैद्यकीय तपासण्या सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई-** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असले तरी, प्राथमिक माहितीनुसार काळजी करण्यासारखी कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगण्यात येत आहे. नियमित वैद्यकीय तपासणीसाठीच शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या काही



महत्त्वाच्या चाचण्या सध्या सुरू आहेत.

वाढते वय, सततचा प्रवास आणि राजकीय तसेच सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम लक्षात घेता डॉक्टरांनी नियमित आरोग्य तपासणीचा सल्ला दिला होता. त्यानुसारच शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या प्रकृतीत कोणतीही गंभीर समस्या नसून केवळ रुटीन चेकअपचा भाग म्हणून विविध वैद्यकीय तपासण्या केल्या जात असल्याचे समजते. त्यामुळे कार्यकर्ते आणि समर्थकांनी कोणतीही चिंता करू नये, असेही सांगण्यात आले आहे.

# अमरावती विद्यापीठाच्या २८ मे रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या उन्हाळी-२०२६ लेखी परीक्षांच्या वेळापत्रकात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. २८ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.



विद्यापीठाने जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, २८ मे २०२६ रोजी 'बकरी ईद' असल्याने या दिवशी नियोजित असलेल्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. २८ मे रोजी होणाऱ्या परीक्षा आता १७ जून २०२६ रोजी घेतल्या जाणार आहे. या परीक्षेची वेळ आणि परीक्षा केंद्र यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, ते पूर्वीप्रमाणेच राहतील. या संदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालया ंचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले आहे.

# पक्षात कोणताही वाद नाही; राष्ट्रवादी एकसंघ असल्याचा दावा

## देवगिरीवरील बैठकीनंतर अफवांना ऊत; बनसोडेंचं मोठं स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई** मुंबईतील देवगिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीनंतर पक्षातील अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना मोठं उधाण आलं होतं.

मात्र या सर्व चर्चांवर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय बनसोडे यांनी प्रतिक्रिया देत स्पष्ट शब्दांत पक्षात कोणताही वाद नसल्याचा दावा केला आहे. माध्यमांमध्ये सुरू असलेल्या वादाच्या बातम्या पूर्णपणे निराधार असून पक्ष सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली एकसंघपणे काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

संजय बनसोडे यांनी म्हटलं की, २६ मे रोजी झालेल्या बैठकीत पक्षाच्या सर्व आजी-माजी खासदार,



आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या बैठकीत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला असून आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला. सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील, त्यामागे सर्व नेते आणि पदाधिकारी ठामपणे उभे राहतील, अशी ग्वाही बैठकीत देण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. पक्ष बळकटीसाठी सर्वजण एकत्रितपणे कार्यरत राहणार असल्याचं बनसोडेंनी सांगितलं.दरम्यान, बैठकीदरम्यान सुनील तटकरे यांनी त्यांच्यावर आणि प्रफुल पटेल यांच्यावर सातत्याने होत असलेल्या टीकेबाबत नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली होती. पक्षातील कुणीही आमच्या समर्थनासाठी पुढे येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## संपादकीय ......

# तपपूर्तीच्या उत्साहाला महागाईचे ग्रहण

नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. २०१९ आणि २०२४ लोकसभेत भाजपप्रणित एनडीए आघाडी विजयी झाली. सलग १२ वर्षांपासून देशात मोदी सरकार आहे. १२ वर्षांना आपल्याकडे साधारणपणे एक तप मानले जाते. या तपपूर्तीचा सोहळा उत्सवप्रिय भारतीय जनता पक्षाने राज्यात आणि देशात फार केला नाही. त्याला कारण ठरले ते पंतप्रधान मोदींचे काटकसरीचे आवाहन. पाच राज्यांच्या निवडणुकीनंतर नरेंद्र मोदींनी देशाची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे न सांगता आखाती युद्धामुळे देशातील परिस्थिती वाईट असल्याचे सांगितले. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, सोने खरेदी, परदेश दौर्यांना कात्री लावा, खाद्य तेलाचाही वापर कमी करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना केले आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाची तपपूर्ती होत असताना देशाने स्वीकारलेल्या काटकसरीच्या धोरणामुळे या तपपूर्तीचा मोठा सोहळा होत नसला तरी छोटेखानी समारंभ होत आहेतच.

मुंबईत पंतप्रधानांच्या १२ वर्षांतील कार्यकाळाचा आढावा घेणारे पुस्तक भाजपतर्फे प्रकाशित करण्यात आले. यामध्ये नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताने कशी प्रगती केली याचे गोडवे गाण्यात आले. आखाती युद्धानंतर भारतीय अर्थव्यवस्था गरुडझेप घेणार असे स्वप्नरंजन स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले. मात्र हे करत असताना ते सोयीस्करपणे राज्यात पेट्रोल-डिझेलची टंचाई असल्याचे विसरले. कांद्याने शेतकर्यांचा वांदा केला असून त्यांना रस्त्यावर आणले आहे. काजू-आंबा उत्पादक शेतकरी त्रस्त आहे. हे सर्व सांगण्यास मुख्यमंत्री फडणवीस आनंदाच्या भरात कदाचित विसरले असण्याची शक्यता आहे. मात्र गेल्या १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांनी भारताला आर्थिक मंदी आणि महामारीच्या संकटातून बाहेर काढून जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवले आहे.

कल्याणकारी योजना’ आणि ‘मोठ्या पायाभूत सुधारणा’ यांचा समतोल साधत भारताला २०४७ पर्यंत ‘विकसित भारत’ बनवण्याच्या दिशेने ही एक महत्त्वपूर्ण वाटचाल असल्याचे त्यांनी आत्मविश्वासाने सांगितले. नरेंद्र मोदींच्या गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळाची तुलना ही साहजिकच त्यांच्या आधीचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या कार्यकाळाशी होत असते. देशातील सध्याची परिस्थिती पाहिली तर ही तुलना करणे अधिक क्रमप्राप्त ठरते. आधीच्या १५ वर्षांमध्ये एक अर्थतज्ज्ञ देशाचे पाच वर्षे अर्थमंत्री आणि १० वर्षे पंतप्रधान होते. त्यांच्या कार्यकाळात देशामध्ये परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात आली.

अर्थव्यवस्था खुली केल्यानंतर जगभरातील उद्योग भारतात आले. भारतीय तरुणांना देशात आणि परदेशातही रोजगाराची मोठी संधी निर्माण झाली. २००४ ते २०१४ या काळात भारताचा सरासरी वार्षिक विकासदर (जीडीपी) सुमारे ७.७ टक्के राहिला. काही वर्षांत तर हा दर ९ टक्क्यांच्या पार गेला होता. सध्या भारताचा जीडीपी ५.५ ते ६ टक्के आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर सर्वात पहिला परदेश दौरा भूतानचा केला होता. तर नुकतेच ते नॉर्वे, इटली या देशांचा दौरा करून आले. १२ वर्षांमध्ये मोदींनी जवळपास ८० देशांचा दौरा केला आहे. यामध्ये सर्वाधिक अमेरिकेचा दौरा त्यांनी केला. मात्र आज अमेरिकेचा डॉलर भारतीय रुपयाला वाकुल्या दाखवत आहे. रुपयाच्या तुलनेत डॉलर गेल्या १२ वर्षांमध्ये अधिक मजबूत झाला आहे. लवकरच १०० पार करण्याची शक्यता आहे.पेट्रोल, डिझेलच्या दरांनी विक्रमी उंची गाठली आहे. भारताचे परराष्ट्र धोरण काय हे विचारण्याची सोय नाहीच, मात्र तसे कोणी धाडस केलेच तर ‘मेलोडी खाओ खुद जान जाओ’ अशी सध्याची स्थिती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला. ‘पीएम गतिशक्ती’ मास्टर प्लॅनअंतर्गत देशभरात महामार्ग, मालवाहू कॉरिडॉर, नवीन विमानतळ आणि ‘वंदे भारत’सारख्या अत्याधुनिक ट्रेन्सचे जाळे निर्माण करून लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र या सुविधांचा फायदा सर्वसामान्य भारतीयांना किती झाला, हा संशोधनाचा विषय आहे. सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू आहेत. मुंबईतून कोकणात जाण्यासाठी एकाही रेल्वेला आरक्षण मिळण्याची सोय नाही. मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण होण्यासाठी विक्रमी काळ घेत आहे. मग ही गतिशक्ती आणि अत्याधुनिक ट्रेन्सचे जाळे नेमके कुठे आणि कोणासाठी आहे, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडत आहे.

# सरकारी रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा

## शासकीय विभागाकडून खासगी रक्तपेढीला दिले जाते प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–** उन्हाच्या दाहकतेचा सामना करणाऱ्यांना आता रक्तटंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. सरकारी रक्तपेढ्यांमध्ये रक्तचा तुटवडा असून शासकीय विभागाकडून खासगी रक्तपेढ्यांना प्राधान्य देण्यात येत आल्याची धक्कादायक स्थिती आहे. उन्हाळा सुरू झाला की जवळपास सर्वच रुग्णालयांत रक्ताची चणचण भासते. परीक्षेचा कालावधी, सुटीच्या काळात वाढलेली नियोजीत सर्जरींची संख्या आणि उन्हाळ्यामुळे वाढत असलेले आजार या सर्वच बाबींचा परिणाम रक्तसाठा कमी होण्यावर होतो. अशा पार्श्वभूमीवर दुर्घटना घडल्यास संबंधितांना रक्त मिळणेही कठीण होते. म्हणूनच उन्हाळ्याच्या काळात रक्ताचं नातं जोडणाऱ्या रक्तदात्यांची संख्या वाढणे महत्त्वाचे आहे. मात्र सरकारी विभागाकडूनच खासगी रक्तपेढी धारकांना प्राधान्य देत असल्याचे पाहायला मिळत आहे. याकडे जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे म्हटले जाते. पण हे दान देण्याचं दातृत्व मात्र फारच थोड्या लोकांमध्ये दिसतं. अपघात, शस्त्रक्रिया, बाळंतपण, ॲनिमिया, डायलिसिस, थॅलसेमिया, सिकलसेल आदी आजारांत रक्ताची गरज भासते, अशा रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. शिवाय जिल्ह्यात दररोज सरासरी पाच ते सहा



अपघात होतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज भासते. परंतु उन्हाळ्यात रक्तपेढ्यांमध्येच रक्तसाठा पुरेसा नसल्यामुळे संबंधितांना रक्तासाठी ऐनवेळी धावपळ करावी लागत असल्याचे चित्र पाहायला मिळते. उन्हाळ्याच्या दिवसांत शिबिरांची संख्या कमी होते, त्यामुळे या काळात रक्त संकलनाची प्रक्रियाच बंद पडते. एप्रिल ते मे महिन्यांतील उन्हाळ्याच्या कालावधीत ही संख्या साधारणतः तीस ते चाळीस टक्क्यांनी घटते, असा दरवर्षीचा अनुभव आहे. यंदाही रक्ताची चणचण भासत आहे. एकीकडे रक्तदान शिबिरांचे प्रमाण कमी होत असले तरी अपघात आणि ऑपरेशन्समध्ये घट झालेली नाही. विशेष म्हणजे, सुटीच्या काळात नियोजित ऑपरेशन्स करण्यावर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांचा भर असतो. बहुतांश शस्त्रक्रियांच्या रुग्णांना रक्ताची गरज भासते. त्यामुळे रुग्णालयातील व रक्तपेढ्यांमधील रक्तसाठा झपाट्याने कमी होतो, अशा परिस्थितीत सरकारी रक्तपेढ्यांना उन्हाळ्यामध्ये रक्त संकलित करण्याकरिता विशेष प्रयत्न करावे लागताहेत. त्यात रक्तदान शिबिर आयोजनांवर भर दिला जातोय. मात्र त्याला सरकारी विभागाकडूनच फाटा दिला जात असल्याचे दिसून येत आहे. सरकारी रुग्णालयात रुग्णांना मोफत रक्त देण्यात येत असल्याचे माहीत असून सुद्धा सरकारी विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून खासगी रक्तपेढी धारकांना प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी आरोग्य कर्मचारी रक्तदान शिबिर आयोजित करीत आहेत. मात्र ते सरकारी रक्तपेढी धारकांना बोलावण्याऐवजी खासगी रक्तपेढी धारकांना बोलावत असल्याचे दिसून येत आहे, यामुळे सरकारी रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. हा रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी किमान सरकारी विभागांनी आयोजित रक्तदान शिबिराला सरकारी रक्तपेढी धारकांना बोलावण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे, जेणेकरून गोरगरीब रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यासाठी मदत होईल.

# दगड टाकून बुजविले पाणीपुरवठ्याचे व्हॉल्व्ह

## उपद्रवी रहिवाशाचा राग अनावर, नागरिकांना पाणीटंचाईचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७पथ्रोट,** स्वतःच्या घरी पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याचा राग मनात धरून एका रहिवाशाने पाणीपुरवठ्याच्या तीन ठिकाणच्या व्हॉल्व्ह असलेल्या पाइपमध्ये दगड टाकून ते बुजून टाकल्याचा प्रकार काल बसस्टँड परिसरात उघडकीस आला आहे. सदर प्रकारामुळे त्याठिकाणचा पाणीपुरवठा बंद पडला असून त्या उपद्रवी रहिवाशामुळे संपूर्ण परिसरात पाणीटंचाईला सुरवात झाली आहे. शहानूर धरणावरून गावाला पाणीपुरवठा होत असलेल्या जलवाहिनीमध्ये मोठे लिकेज झाल्याने मागील आठवड्यात सतत चार ते पाच दिवस पाणीपुरवठा बंद पडला होता. त्यावेळी गावकऱ्यांना पाणीटंचाईची मोठी झळ सहन करावी लागली होती. त्यानंतर लिकेजची दुरुस्ती होऊन गावात पुन्हा एकदा व्यवस्थित पाणीपुरवठा सुरळीत करताना ग्रामपंचायतला दोन ते तीन दिवसांचा अवधी सहन करावा




लागला होता. अशातच आता संपूर्ण गावात व्यवस्थित पाणीपुरवठा सुरू असताना बसस्टँड परिसराला लागून असलेल्या वॉर्ड क्रमांक चार भागात हनुमान मंदिर, पारडी रोड व त्याला लागून असलेला रहिवासी भाग, अशा चार ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या असलेल्या व्हॉल्व्हच्या पाइपमध्ये तेथील एका रहिवासी व्यक्तीने स्वतःच्या घरी पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याचा राग मनात धरून चक्क दगड टाकून ते पाइपच बुजून टाकले आहेत. परिणामी पान्याच्या साह्याने त्या पाइपमधील थ्रेड (आटे) कर्मचाऱ्याला फिरवता येत नसल्यामुळे पाणीपुरवठा बंद पडला आहे. काल दुपारी हा प्रकार केल्यानंतर त्याठिकाणी कृत्रिम पाणीटंचाईला सुरवात झाली आहे. अशाप्रकारची मनमानी करणाऱ्या त्या रहिवाशाविरुद्ध ग्रामपंचायतने कायदेशीर कारवाई करावी. जेणेकरून पुन्हा कोणी शासकीय कामात अशाप्रकारे अडचण निर्माण करण्याची हिंमत दाखविणार नाही. एवढेच नव्हे तर त्या पाइपमध्ये टाकलेले दगड काढताना तसेच ती जागा पुन्हा एकदा व्यवस्थित करताना जो काही खर्च होईल तोसुद्धा त्याच व्यक्तीकडून वसूल करण्यात यावा, अशी मागणीसुद्धा तेथील रहिवाशांनी केली आहे.

# भेंमडी धरणाच्या एअरव्हॉल्व्हमुळे संत्र्याच्या मृगबहराचे नुकसान

## भरपाई देण्याची शेतकऱ्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७वरुड–** भेंमडी धरणाच्या जलवाहिनीवरील एअरव्हॉल्व्ह निसटल्याने धरणाचे पाणी शेतात घुसून संत्राबागेचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे टेंभूरखेडा येथील शेतकरी मनोज कवटकर यांनी तहसीलदारांकडे नुकसानभरपाईची मागणी केली आहे. श्री. कवटकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, मौजा भेंमडी येथील गट क्रमांक ३३६ मधील त्यांच्या ०.८१ हेक्टर क्षेत्रात ३३६ संत्रा झाडांची बाग आहे. भेंमडी धरणातून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी पाणी सोडण्यात आले; मात्र याबाबत कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. अचानक मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने त्यांच्या शेतातून गेलेल्या धरणाच्या जलवाहिनीवरील एअरव्हॉल्व्ह निसटला. परिणामी जलवाहिनी फुटून मोठ्या प्रमाणात पाणी शेतात साचले. या पाण्यामुळे संत्राबागेतील मृगबहाराचे नुकसान झाले असून झाडांनाही फटका बसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. धरणातून पाणी सोडण्यात



येणार असल्याची पूर्वकल्पना मिळाली असती, तर जलवाहिनीची तपासणी करून संभाव्य नुकसान टाळता आले असते, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे. एअरव्हॉल्व्ह निसटल्यामुळे शेतात पाणी साचून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करीत संबंधित विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी मनोज कवटकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# शासनाचे ऑनलाइन पोर्टल ठप्प, पालक त्रस्त

## नवीन जीपीआर पोर्टलमध्ये तांत्रिक बिघाड, शैक्षणिक प्रवेशकाळात विद्यार्थ्यांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती** राज्य शासनाच्या नवीन जीपीआर पोर्टलमध्ये निर्माण झालेल्या गंभीर तांत्रिक अडचणींमुळे राज्यभरातील आपले सरकार व महा-ई-सेवा केंद्रांचे ऑनलाइन कामकाज मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. नवीन साईट सुरू करण्यात आल्यानंतर पोर्टल लॉगिन न होणे, सर्वर एरर, अर्ज प्रक्रिया अर्धवट राहणे, संथगतीने सेवा चालणे तसेच वारंवार तांत्रिक अडथळे निर्माण होत असल्याने विद्यार्थी व सेवा केंद्र चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या दहावी व बारावीच्या निकालानंतर राज्यभरात शैक्षणिक प्रवेशप्रक्रिया वेगाने सुरू असून विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, ईडब्ल्यूएस तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची तातडीची आवश्यकता आहे. मात्र पोर्टलमधील तांत्रिक बिघाडामुळे हे दाखले वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थी, पालक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. महा-ई-सेवा केंद्रांचे पोर्टल लॉगिन होत नसल्याने पुढील ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. परिणामी राज्यभरातील हजारो अर्ज प्रलंबित राहिले असून नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. ग्रामीण भागातील नागरिक व



पालकांकडून केंद्र चालकांवर प्रश्नांचा भडीमार होत असून अनेक ठिकाणी सेवा केंद्र संचालक पेचात सापडले आहेत. शासनाच्या तांत्रिक त्रुटींमुळे नागरिकांचा रोष मात्र केंद्र चालकांना सहन करावा लागत असल्याची भावना संचालकांनी व्यक्त केली आहे. सदर जीपीआर पोर्टल हे मंत्रालय स्तरावर विकसित करण्याच्या सुचनांनुसार तयार करण्यात आले असून महाआयटीकडून मागील चार महिन्यांपासून व्हीएलई, डेस्क ऑफीसर तसेच संबंधित अधिकारी वर्गाला मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडचणी येत असून त्याचा थेट परिणाम नागरिक सेवा व शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेवर होत आहे. आपले सरकार सेवा केंद्र संचालकांनी नवीन पोर्टल पूर्णपणे स्थिर व सुरळीत होईपर्यंत जुनी साईट सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. तसेच तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून नागरिकांना सुरळीत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राज्यभरातून होत आहे. अन्यथा राज्यभरातील सेवा केंद्र चालकांना आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल, असा इशाराही संघटनेतर्फे देण्यात आला आहे.

# धामणगावात रेल्वेप्रवाशांसाठी थंड पाण्याची सेवा

## जल सेवाभावी ग्रुपचा उपक्रम, दररोज ४०० पाण्याच्या कॅनचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७धा.रेल्वे** वाढत्या उन्हाच्या तीव्र झळांमध्ये रेल्वे प्रवाशांची तहान भागविण्यासाठी धामणगावरेल्वे येथील जल सेवाभावी ग्रुप गेल्या आठ वर्षांपासून सेवा देत आहे. रेल्वेस्थानकावर दुपारी एक ते रात्री नऊ वाजेपर्यंत रेल्वेगाड्यांच्या जनरल बोगींमध्ये मोफत थंड पाण्याचे वाटप करण्यात येत आहे. या सेवेसाठी दररोज जवळपास ४०० पाण्याच्या कॅनची आवश्यकता भासत असून, कार्यकर्ते दिवस-रात्र सेवेत कार्यरत राहून प्रवाशांची तहान भागवत आहेत. तहानलेल्याला पाणी



पाजणे हे सर्वात मोठे पुण्य, या भावनेतून सुरू करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत रेल्वेप्रवासादरम्यान अनेक प्रवाशांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. तीव्र उष्णता, लांबचा प्रवास आणि वाढलेले तापमान लक्षात घेता ‘आमची सेवा-तुमची तहान भागवणे’ हा संदेश देत जल सेवाभावी ग्रुपने रेल्वेस्थानकावर येणाऱ्या प्रवासी, कष्टकरी श्रमिक, गरीब व गरजू नागरिकांसाठी मोफत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. विशेष म्हणजे, गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेससह स्थानकावर थांबणाऱ्या विविध प्रवासी गाड्यांच्या जनरल डब्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन कार्यकर्ते पाण्याचे वाटप करतात. या उपक्रमामुळे दररोज हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळत असून, प्रवाशांकडून जल सेवाभावी ग्रुपच्या कार्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. दरम्यान, हा उपक्रम अधिक व्यापक आणि सातत्यपूर्ण राहावा, यासाठी ‘जल सेवाभावी ग्रुप’च्या वतीने नागरिकांना लोकसहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष सेवा देणे, सेवाभावी वृत्तीने पाठबळ देणे किंवा आर्थिक मदत करून या पुण्य कार्यात सहभागी होण्याचे आवाहन ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पानपिंपरी उत्पादक आर्थिक संकटात

## प्रचंड उष्णतेमुळे पिके धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि,२७अंजनगाव सुर्जी–** प्रचंड तापमानाचा मोठा परिणाम पान पिंपरी या पिकावर झाला असून त्याचा फरक उत्पादनावर पडणार असल्याने पानपिंपरी उत्पादक शेतकर्यांमध्ये चिंचेचे वातावरण निर्माण झाले आहे. पानपिंपरी हे औषधी गुणधर्माने युक्त असलेले नाजुक आणि जोखमीचे पीक आहे. या औषधीयुक्त असलेल्या पानपिंपरीचा उपयोग आयुर्वेदिक औषधीमध्ये केल्या जातो. पानपिंपरी या पिकाची शेतामध्ये जानेवारी, फेब्रुवारीमध्ये लागवड केल्या जाते. या पिकाचे उत्पादन अंजनगाव सुर्जीमध्ये केवळ बारी समाज अतिशय परिश्रमाने घेत असतो. एप्रिलपासून सुरू असलेली उष्णता वाढत गेल्याने



तापमानात अधिकच वाढ होऊन ४० डिग्री सेल्सिअसच्या वर तापमान गेल्याने पानपिंपरी या पिकाला धोका निर्माण झाला. कडक उन्हामुळे वेलीची पानगळ सुरू झाली. अति उष्णतेमुळे जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती निर्माण झाली असून वेलीवर पाने पिवळी पडून गळण्याचे प्रमाण वाढले आहे. जास्त तापमानात या झाडांची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होत असते, त्यामुळे पाने वाळणे, कडा जळणे, पानावर पिवळे डाग येणे आणि झाडाचा ताजेपणा कमी होणे असा मोठा परिणाम या प्रचंड उष्णतेमुळे पानपिंपरी उत्पादनावर झाला असून यामुळे पानपिंपरी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. विशेष म्हणजे, बारी समाजातील ज्यांच्याजवळ शेती नाही असे शेतमजूर सुद्धा तीन ते चार जण मिळून शेती लागवणीने करतात, तर कुठे वाफे पद्धतीने करार करून पानपिंपरीची लागवड करतात. या अतिउष्णतेच्या परिणामामुळे पानपिंपरी उत्पादक शेतकरी, शेतमजूर अतिशय संकटात सापडले असून शासनाकडून आर्थिक मदतीची मागणी करीत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात सत्कार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७नवी दिल्ली,**आपल्या समर्पित लोकसेवेने महाराष्ट्राची मान राष्ट्रीय पातळीवर उंचावणारे पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात आज एक विशेष कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला यांच्याहस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.



महाराष्ट्र सदनात आयोजित या सोहळ्याला माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना श्री. बोथे म्हणाले,देशाच्या राजधानीत आणि विशेषतः आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र सदनात झालेला हा सत्कार माझ्यासाठी घरच्या कौतुकासारखा आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नसून, माझ्या जीवनात आलेले महान संत, स्वातंत्र्यसेनानी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा आणि कार्याचा हा गौरव आहे. महाराजांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या गुरुकुंज आश्रमातून हजारो विद्यार्थी आणि कार्यकर्ते देशाची संस्कृती, अध्यात्म आणि राष्ट्रप्रेम जगवण्यासाठी अविरत काम करत आहेत. त्या गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत मला काम करण्याची संधी मिळाली, म्हणूनच आज मी इथपर्यंत पोहोचू शकलो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यាप्रसंगी बोलताना निवासी आयुक्त आर. विमला यांनी जनार्दन बोथे यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्राच्या मातीतून देशपातळीवर चमकणाऱ्या अशा ज्येष्ठ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करण्याची संधी महाराष्ट्र सदनाला मिळाली, हे आमचे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. माहिती संचालक हेमराज बागुल यांनी बोथे यांचे सामाजिक कार्य या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले.या कार्यक्रमाला महाराष्ट्र सदनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# तिवसा शासकीय विश्रामगृहातील ओली पार्टी प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

## भाजप आमदारांसह, माजी तालुकाध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांवर आचारसंहिता भंगाचा आरोप

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७ अमरावती :**

राज्य विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना, तिवसा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भाजपाचे आमदार राजेश वानखडे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष निलेश श्रीखंडे, माजी उपजिल्हा प्रमुख प्रदीप गौरखेडे यांच्यासह सुमारे १० ते १५ व्यक्तींनी विधानपरिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता नियम धाब्यावर बसवून शासकीय विश्रामगृहातील उच्च पदस्थांसाठी



आरक्षित असलेल्या व्हीआयपी सूटवर अनधिकृत ताबा मिळवला आणि तिथे मद्यपान पार्टी आयोजित केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल संबंधित राजकीय पदाधिकारी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीचे निवेदन आज अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. संबंधित राजकीय व्यक्तींनी कोणत्याही वैध आरक्षणाशिवाय किंवा अधिकृत परवानगीशिवाय विश्रामगृहातील व्हीआयपी सूट ताब्यात घेतला. धक्कादायक बाब म्हणजे, यावेळी मंत्रालयातील काही कर्मचारी आणि ऑडिटसाठी आलेले शासकीय अधिकारी तेथे उपस्थित होते, त्यांना बाहेर काढण्यात आले. शिवाय, रेस्टहाउस कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व दमदाटी सुद्धा करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या तक्रारीची प्रत अमरावतीच्या पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांनाही माहिती व कारवाईसाठी पाठवण्यात आली आहे. याप्रकरणात जिल्हाधिकारी यांनी कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. तिवसा नगरपंचायतचे विरोधी पक्षनेते अनिल थुल, नगरसेवक वैभव म. वानखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार केली आहे.

> निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे सरळ उल्लंघननिवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, आचारसंहिता लागू असताना शासकीय विश्रामगृह, डाक बंगले किंवा सरकारी निवासस्थानांचा वापर कोणत्याही राजकीय बैठका, प्रचार, मेजवान्या किंवा पक्षीय कार्यक्रमांसाठी करता येत नाही. असे असतानाही तिवसा विश्रामगृहात झालेला हा प्रकार केवळ नियमांचा भंग नसून आचारसंहितेचे सरळ उल्लंघन मानले जात आहे.

# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची रिक्त पदे भरती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती**

राज्यात नागरी आणि ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'नागरी व ग्रामीण लोककल्याण अभियान' राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत आरोग्य व्यवस्थेचा विस्तार करण्यात येणार आहे. या मोहिमेत रिक्त पदे भरण्यापासून ते महिलांसाठी विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यापर्यंतच्या अनेक महत्वाकांक्षी उपक्रमांचा समावेश आहे.

**नागरी भागात नवीन 'आपला दवाखाना'**

या अभियानांतर्गत राज्यातील महापालिका, नगरपालिकांच्या क्षेत्रात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत ३५१ ठिकाणी नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे २६ आणि ठिकाणी 'पॉलिक्लिनिक' कार्यान्वित केली जातील. याशिवाय राज्य योजनेतून ३१ नवीन 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात येणार आहे.

**मोठ्या प्रमाणावर पदभरती**

या नवीन आणि विद्यमान आरोग्य संस्थांमधील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी शासनाने विशेष मोहिमेद्वारे मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे भरण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची एकूण ६ हजार २५८ रिक्त पदे भरली जाणार आहेत. राज्य योजनेंतर्गत (आपला दवाखाना) वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची एकूण ५६५ रिक्त पदे भरली जाणार आहेत. नागरी क्षेत्रांसाठी आशा स्वयंसेविकांची १ हजार ९५ पदे तातडीने भरण्यात येणार आहेत.

**दर बुधवारी 'मेनोपॉज क्लिनिक' महिलांच्या आरोग्य सुविधेसाठी**

या अभियानात विशेष तरतूद करण्यात आली आहे. रजोनिवृत्तीच्या (मेनोपॉज) काळात महिलांना होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि हार्मोनल त्रासांवर मात करण्यासाठी राज्यातील जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये जेथे स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध आहेत, तिथे 'मेनोपॉज' क्लिनिक' सुरू केले जाणार आहेत.-

# जावईबापूंना यंदा कोणता धोंडा?

## सोन्या-चांदीच्या दरांनी ओलांडली सीमा, ज्येष्ठ अधिकमासात अडचण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती-** भारतीय संस्कृतीत अधिकमासाला महत्त्व असून, या महिन्यात जावयाचा मानपान करण्याची परंपरा आहे. यंदा १७ मेपासून ज्येष्ठ अधिकमासाला सुरवात झाली असून, सासरच्या मंडळींनी जावईबापूंना 'धोंडा' देण्यासाठी तयारी सुरू केली आहे. मात्र, सोन्या-चांदीच्या दरांनी घेतलेली गगनभरारी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईमुळे यंदा जावयाचा 'धोंडा' नेमका कसा द्यावा, अशा विवंचनेत सासरेबुवा सापडले आहेत. दर तीन वर्षांनी येणारा हा 'तेरावा महिना' यंदा १७ मे ते १५ जून या कालावधीत आला आहे. या महिन्यात जावयाला सोन्याचा किंवा चांदीचा धोंडा भेट देण्याची प्रथा आहे. बाजारपेठेत सध्या सोन्याचे दर एक लाख ५७



हजार रुपयांवर पोहोचले आहेत, तर चांदीनेही अडीच लाखांचा टप्पा ओलांडला आहे. अशा स्थितीत जावयाचा मान राखताना सासरच्या मंडळींच्या खिशाला मोठी कात्री लागणार असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे बाजारपेठ येथील दुकानांमध्ये विविध प्रकारची नाणी सराफा बाजारात उपलब्ध आहे. दर वाढले असले तरी ग्राहकांची गरज ओळखून सराफा व्यापाऱ्यांनी हलक्या वजनाचे दागिने आणि चांदीचे लहान धोंडे उपलब्ध करून दिले आहेत. ५०० मिलिग्राम ते एक ग्रॅममधील सोन्याच्या अंगठ्या आणि चांदीच्या नाण्यांना मोठी मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# मतदार याद्यांचे मॅपिंग तातडीने पूर्ण करावे

## अमरावती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७ अमरावती :** मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत अमरावती विधानसभा मतदारसंघात पूर्वतयारी सुरू आहेत. या अंतर्गत नागरिकांची २००२ मधील मतदारयादी आणि सध्याची मतदार यादी यांची आपापसात मॅपिंग करण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी संबंधित बीएलओंना भेटून मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ३८ - अमरावती विधानसभा मतदारसंघात अद्यापही २४ टक्के मतदारांचे मॅपिंग होणे बाकी आहे. त्यामुळे ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी तातडीने आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. ज्या मतदारांचे



बीएलओंकडून मॅपिंग पूर्ण झाले आहे,

त्यांची 'एसआयआर' प्रक्रिया अत्यंत सोप्या आणि सुरळीत पद्धतीने पार पडणार आहे. मात्र, ज्यांचे मॅपिंग झालेले नसेल, अशा मतदारांना या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी वेगवेगळी कागदपत्रे सादर करावी लागतील. हा त्रास टाळण्यासाठी मतदारांनी स्वतःहून पुढाकार घेणे गरजेचे आहे.अनेक मतदारांची नावे मतदारयादीत दोन ठिकाणी असण्याची शक्यता असते. अशा मतदारांनी सध्या ते जेथे वास्तव्यास आहेत किंवा ज्या ठिकाणी त्यांना मतदानाचा हक्क हवा आहे, तेथील नाव कायम ठेवावे. तर दुसऱ्या ठिकाणचे नाव कमी करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी किंवा संबंधित बीएलओंकडे 'नमुना अर्ज क्र. ७' सादर करावा, अशी सूचनाही देण्यात आली आहे.

मतदान प्रक्रियेत सुलभता आणि अचूकता आणण्यासाठी नागरिकांनी आपल्या बीएलओंची भेट घेऊन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच दुबार नावांच्या सुधारणेसाठी सहकार्य करावे असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार विजय लोखंडे यांनी केले आहे.-


# अमरावतीच्या 'फिशरीज हब' प्रकल्पाला गती

## विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी मनपात पोहोचून घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

अमरावती शहरात प्रस्तावित अत्याधुनिक फिशरीज हब प्रकल्पाच्या उभारणीसंदर्भात महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी आशिष येरेकर तसेच महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या उपस्थितीत आयोजित या बैठकीत प्रकल्पाच्या विविध तांत्रिक, प्रशासकीय व विकासात्मक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीत मत्स्य विभाग व महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत प्रकल्पा संदर्भातील सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आले. विशेषतः पाण्याच्या टाकीचे बांधकाम व अन्य आवश्यक विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत सूचना करण्यात आल्या. दरम्यान प्रकल्पाच्या उर्वरित विकासकामांबाबत आणि तांत्रिक बाबींवर आवश्यक तपासणी करून कार्यवाही करण्याच्या सूचनासुद्धा देण्यात आल्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठ्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार असून त्यासंदर्भातील बहुतांश कामे पूर्ण झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.या प्रकल्पाचे प्रभावी संचालन, आरएफटी/ईओआय प्रक्रिया व भविष्यातील कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी अनुभवी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. ही समिती आगामी १५ जूनपर्यंत सविस्तर अहवाल सादर करणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, नोडल अधिकारी डॉ. सचिन बोंद्रे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता संजय लेवरकर, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.जि.प. च्या तलावांतील मासे घेणार जिल्हा परिषदेमार्फत बारमाही तलावांमध्ये उत्पादित होणारे मासे या प्रकल्पाशी जोडण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. पूर्णत्वास आलेला हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला.

# वरुडमधील ३२ टक्के लाभार्थी एप्रिलच्या रेशनपासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ वरुड-** महाराष्ट्र शासनाने एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांचे रेशन एकत्र देण्याचा निर्णय घेतला खरा. परंतु प्रशासकीय ढिसाळपणामुळे वरुड तालुक्यातील हजारो लाभार्थी एप्रिल महिन्याच्या अन्नधान्यापासून वंचित राहिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या गंभीर समस्येची दखल घेत मोर्शी विधानसभेचे आमदार चंदू यावलकर यांनी थेट मंत्रालयात अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. त्यांनी धान्य वाटपासाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. वरुड व शेंदूरजनाघाट नगर परिषद क्षेत्रात भारतीय खाद्य निगमकडून (एफसीआय) थेट वाहतुकीद्वारे अन्नधान्याचा



पुरवठा केला जातो. मात्र, एप्रिल महिना संपून मे महिन्याचे १४ दिवस उलटले तरी रेशन दुकानांमध्ये अपूर्ण धान्य पुरवठा झाला होता. अपूर्ण साठ्यामुळे रेशन दुकानदारांना धान्य वाटप करणे शक्य झाले नाही. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर १६ मे रोजी काही दुकानांमध्ये उर्वरित अन्नधान्याचा पुरवठा करण्यात आला. त्यानंतर काही ठिकाणी दुकानदारांनी धान्य वाटप सुरू केले. दरम्यान, धान्य वाटप सुरू होऊन अवघे दोन दिवस झाले असतानाच १८ मे रोजी अचानक ई-पॉस मशीनवरून एप्रिल महिन्याचा डेटा हटवण्यात आला. त्यामुळे धान्य पोहोचले असतानाही लाभार्थ्यांना ते मिळू शकले नाही.

**मुदतवाढीसाठी आ. यावलकर यांनी घेतली अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांची भेट**

आपल्या मतदारसंघातील हजारो गरीब कुटुंबे रेशनपासून वंचित राहणार असल्याचे समजताच आमदार चंदू यावलकर यांनी तात्काळ पावले उचलली. त्यांनी मुंबईतील मंत्रालयात जाऊन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. त्यांनी त्यांना सविस्तर मागणीचे पत्र सोपवले.

एप्रिल २०२६ चे धान्य ई-पॉस मशीनवर पुन्हा उपलब्ध करून देऊन धान्य वाटपासाठी किमान १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार यावलकर यांनी केली. यावर मंत्री छगन भुजबळ यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना तत्काळ योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता तालुक्यातील वंचित लाभार्थ्यांना एप्रिलचे धान्य मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# परतवाड्यात विद्युत खांबावरील दिवा पडला रस्त्यावर, कामावर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७परतवाडा-** जयस्तंभ ते दुराणी चौक, या मार्गातील विद्युत खांबावरील पथदिवा अचानक वर्दळीच्या वेळेत तुटून खाली पडला. सुदैवाने दुचाक्या मागे पुढे होत्या व तो खुल्या जागेवर पडल्याने कोणालाच दुखापत झाली नाही. यामुळे झालेल्या कामाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.



जवळपास सहा-सात महिन्यांपूर्वीच जयस्तंभ चौक ते दुराणी चौक, या मार्गावर लाखो रुपये खर्च करून दुभाजकांवर (डिझायनर पथदिवे) विद्युत खांब व आकर्षक पथदिवे लावण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे हा मार्ग अरुंद असून नेहमीच मार्गावर गर्दी राहते. गेल्या एका वर्षातच या उभारलेल्या पथदिव्यांचे तीनतेरा वाजले असल्याचे पाहायला मिळत आहे. यातील काही पथदिवे बंद असून नुकताच सायंकाळी साडेसातच्या सुमारास गावंडे अचानक वर्दळीच्या वेळेत विद्युत खांबावरील पथदिवा तुटून खाली पडला. सुदैवाने दुचाकी वाहने मागेपुढे होती. त्या दोघांच्या मध्येच दिवा पडल्याने कोणालाच दुखापत झाली नाही. मात्र जर एखाद्याच्या डोक्यावर अथवा सुसाट वाहन चालकाच्या अंगावर तो पडला असता, तर दुर्घटना घडली असती. यापूर्वीही एक पथदिवा पडला असल्याचे नागरिकांनी सांगितले. वर्षभराच्या कालावधीतच पथदिवे तुटून खाली पडत असल्याने या कामावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

# भाकपकडून निकृष्ट धान्य पुरवठ्याचा तीव्र निषेध

## तिवसा तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७तिवसा-** सरकारी स्वस्त धान्य दुकानांतून नागरिकांना पुरवण्यात आलेले धान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (भाकप) तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. खाण्यायोग्य धान्य मिळावा, या मागणीसाठी पक्षाने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवले आहे. भाकपचे तिवसा तालुका सचिव कॉ. प्रकाश सोनोने यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

केंद्र आणि राज्य सरकार गरीब व निराधार जनतेला अन्न मिळावे, या उदात्त हेतूने प्रतिमानसी प्रतिमाह तीन किलो तांदूळ आणि दोन किलो गहू पुरवते. सध्या एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी वितरित करण्यात आले आहे. मात्र, यावेळचे गहू-तांदूळ खाण्यायोग्य नसल्याने भाकपने तीव्र आक्षेप घेतला आहे.

त्यांच्या मते, हे धान्य इतके खराब दर्जाचे आहे की ते लाभार्थ्यांना आहारात घेणे अत्यंत कठीण झाले आहे. गहू खाण्यास योग्य नसून, तांदळात बारीक चुरी आणि भुकटी



मिसळलेली आहे. या निकृष्ट धान्य पुरवठ्यामागे पुरवठा करणारा ठेकेदार आणि त्यावर नियंत्रण ठेवणारे पुरवठा अधिकारी यांची मिलीभगत असल्याचे भाकपने म्हटले आहे.

त्यामुळे संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करून सुधारित धान्य पुरवले जावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिवाय, गेल्या चार दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये होत असलेली वाढ आणि त्यांची चणचण याचाही निषेध नोंदवण्यात आला.

या आंदोलनात राजाभाऊ बाभुळकर, दिलीप गोहत्रे, देवेंद्र बावणे, श्रीकृष्ण लांजेवार, अनिकेत खुळे, जितेंद्र कोरडे, सुरेश कळसकर, नवाज पठाण, सदाशिव महिंगे, सुनील मुळे, नितीन काळकर, गणेश ठोंबरे, आरूफ जमीर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री हर्षवर्धन देशमुख आणि श्री दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी

## सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास या संकल्पनेवर होणार नेत्रदीपक सोहळा

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७अमरावती**

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारसाची जपवणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख तथा कोषाध्यक्ष मा.श्री.दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आल्याची माहिती शिव परिवाराच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

हॉटेल महफिल इन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत शिव परिवाराच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचा प्रवास हा केवळ संस्थात्मक नेतृत्वाचा नसून सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जपणाऱ्या कार्यसंस्कृतीचा आदर्श मानला जातो. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात या दोनही नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण मा.खा. शरदचंद्रजी पवार साहेब राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषणजी गवई, केंद्रीय मंत्री मा. ना.नितीनजी गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे, राज्यमंत्री ना. डॉ. पंकजजी भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्री. श्रीचंदजी तेजवानी उपस्थित राहणार आहेत.

### दिग्गजांची राहणार उपस्थिती शिव परिवाराचे भव्य आयोजन




यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्यात मा. हर्षवर्धनजी देशमुख आणि मा. दिलीपबाबू इंगोले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात येणार असून अनेक मान्यवर त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नाते असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे. या अमृत महोत्सव सोहळ्यास संपूर्ण विदर्भ तसेच राज्यातून हजारो मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजनासाठी शिव परिवाराच्या वतीने शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य असा स्टेज उभारण्यात येणार असून नागरिकांना कार्यक्रम बघता यावा यासाठी प्रत्येक ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे. सोबतच हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबु इंगोले यांच्या जीवनावरील चित्रफीत देखील दाखविण्यात येणार आहे. नागरिकांची सुनियोजित बैठक व्यवस्था या प्रांगणात करण्यात येणार असून यामध्ये व्हीआयपी व्यवस्था, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, ज्येष्ठ नागरिक, महिला, पत्रकार यांच्यासाठी देखील स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकासाठी भव्य अशी भोजन व्यवस्था, पार्किंग या सर्व गोष्टीची बारकाईने व्यवस्था करण्यात आली आहे. शिव परिवाराच्या आनंदात भर घालणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व वैदर्भीय नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक शिव परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.या पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. गजाननराव पुंडकर,ड.जे.व्हि.पाटील पुसदेकर, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाषराव बनसोड, सुरेश दादा खोटरे, सचिव प्राचार्य डॉ.वि.गो ठाकरे, डॉ. पद्माकर सोमवंशी,स्विकृत सदस्य प्राचार्य अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ,डॉ आजीवन सभासद बबनराव चौधरी, राजाभाऊ सुंदरकर,आदी मान्यवर उपस्थित होते.

# सूर्याचा रोहिणी नक्षत्रात प्रवेश८ जूनपासून मृग नक्षत्र

## वाहन बेडूक नक्षत्रांवरून आजही लावला जातो पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

एकीकडे अमरावती जिल्ह्याला गेल्या तीन दिवसांपासून तापमानाचा 'रेड अलर्ट' देण्यात येत आहे. दरम्यान आता शेतकऱ्यांचे लक्ष मान्सूनकडे लागले असून, सूर्याचा रोहिणी नक्षत्रात सोमवारपासून प्रवेश होत आहे. रोहिणी नक्षत्रात यंदा चांगला पाऊस बरसेल, या आशेने शेतकऱ्यांनी शेतीपूर्व कामांना सुरुवात केली आहे. तीव्र उष्णतेमुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांना आता पहिल्या पावसाची प्रतीक्षा लागली आहे. हवामानशास्त्र विकसित होण्यापूर्वी खगोलशास्त्राच्या आधारे सूर्य, चंद्र, ग्रह आणि ताऱ्यांच्या स्थितीवरून पंचांगाद्वारे पावसाचा अंदाज वर्तविला जात होता.

पंचांग शास्त्रातील पहिले पावसाचे नक्षत्र म्हणून रोहिणी नक्षत्राला विशेष महत्त्व आहे. पंचांगातील नक्षत्रे, त्यांची वाहने तसेच पक्ष्यांच्या घरट्यांवरून ग्रामीण भागात आजही पावसाचा अंदाज बांधला जातो. त्यामुळे शेतकरी वर्गाचा पंचांगातील हवामान अंदाजावर अजूनही विश्वास कायम आहे. ८ जूनपासून मृग नक्षत्र सुरू होणार असून त्याचे वाहन 'बेडूक आहे.

**पंचांगानुसार यंदाच्या नक्षत्रांचे भाकीत–** यंदा २५ मे रोजी रोहिणी नक्षत्राला सुरुवात होत आहे. ८ जूनपासून मृग नक्षत्र सुरू होणार असून, वाहन 'बेडूक' असल्याने चांगल्या पावसाचा अंदाज आहे. २२ जूनपासून सुरू होणाऱ्या आद्रा नक्षत्राचे वाहन 'गाढव' असल्याने पाऊस कमी राहण्याची शक्यता आहे. ६ जुलैपासून पुनर्वसु नक्षत्र सुरू होईल. त्याचे वाहन 'घोडा' असल्याने सर्वत्र चांगला पाऊस होण्याचे संकेत आहेत. २० जुलैपासून सुरू होणारा पुष्य नक्षत्राचे वाहन 'उंदीर' असून मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ३ ऑगस्टपासून आश्लेषा नक्षत्र सुरू होणार असून त्याचे वाहन 'हत्ती असल्याने उत्तम पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



१७ ऑगस्टपासून मघा नक्षत्र सुरू होणार असून त्याचे वाहन 'मोर' आहे. त्यामुळे समाधानकारक पाऊस होण्याचा अंदाज आहे. ३० ऑगस्टपासून पूर्वा फाल्गुनी नक्षत्र सुरू होईल. त्याचे वाहन 'गाढव' असून चांगला पाऊस होण्याचे संकेत आहेत. १३ सप्टेंबरपासून उत्तरा फाल्गुनी नक्षत्राचे वाहन 'बेडूक' असल्याने साधारण पाऊस अपेक्षित आहे. २७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या हस्त नक्षत्राचे वाहन 'उंदीर' असल्याने पुन्हा चांगल्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

वाहनावरून पावसाचा अंदाज नक्षत्रांबरोबरच पावसाचा अंदाज त्याच्या वाहनावरूनही केला जातो. प्रत्येक नक्षत्राला एक विशिष्ट वाहन जोडलेले असते. हत्ती, बेडूक, म्हैस ही वाहनं असतील तर भरपूर पाऊस पडतो. उंदीर, गाढव, मेंढा वाहनं असतील तर कमी प्रमाणात पाऊस पडतो. मोर, कोल्हा, घोडा या वाहनावरून आलेला पाऊस मध्यम स्वरूपात पडतो. बोली भाषेतील पावसाची नावे आणि त्यांच्या वाहनानुसार पावसाचा अंदाज शेतकरी लावतात. ग्रामीण भागात आजही नक्षत्रानुसार पावसाचा अंदाज लावला जातो.–

# दहीगाव येथे अंड्यासह अजगर पकडला

## अमरावती जिल्ह्यातील पहिली घटना असल्याची चर्चा..



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७चांदुर रेल्वे –** चांदूर रेल्वे तालुक्यातील दहीगाव येथे पुंजाराम रामकृष्ण शेंडे यांच्या शेतामध्ये काम सुरू असताना मोठा अजगर आढळून आला. विशेष म्हणजे या अजगरासोबत अंडी देखील आढळून आली असून, अमरावती जिल्ह्यात आजपर्यंत अंड्यासह अजगर पकडल्याची ही पहिलीच घटना असल्याची माहिती समोर येत आहे.घटनेची माहिती मिळताच गावकरी घटनास्थळी जमा झाले. यावेळी ऋषभ शेंडे व जीवन शेंडे यांनी अजगर पकडण्यासाठी मदत केली. तसेच सर्पमित्र शुभम विघे व यश विघे यांनी सुरक्षितरित्या अजगर पकडून वनविभागाच्या ताब्यात दिला.घटनेची माहिती तत्काळ फॉरेस्ट डिपार्टमेंटला देण्यात आली.

वनविभागाचे एफ.डी. गवई व स्वमेश्वर घोडमारे यांनी घटनास्थळी भेट देऊन पुढील कार्यवाही केली.सर्पमित्रांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही वन्य प्राण्याला किंवा सापाला मारू नये. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत वन्यजीवांना इजा केल्यास किंवा त्यांची हत्या केल्यास कायदेशीर कारवाई होऊन जेलची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे अशा वेळी वनविभाग किंवा सर्पमित्रांशी संपर्क साधावा.

# अंजनगाव सुर्जी पालिकेच्या अग्निशमन विभागावर गंभीर आरोप

## उपनगराध्यक्षा प्रियांका मालठाणे यांची विभागीय चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगर परिषदेच्या अग्निशमन विभागातील पर्यवेक्षक संदेश जोगदंड यांच्या कथित मनमानी आणि हलगर्जी कारभारामुळे शहरातील नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा गंभीर आरोप उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे यांनी केला आहे. शहरात काल झालेल्या भीषण आगीच्या घटनेनंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.दि. २५ मे रोजी अंजनगाव सुर्जी शहरातील एका भागात भीषण आग लागून दोन दुकाने जळून खाक झाली. या घटनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करण्यात आले होते.

मात्र, घटनास्थळाजवळ अग्निशमन वाहन उपलब्ध असूनही ते पोहोचण्यास तब्बल एक तास उशीर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, घटनास्थळी पोहोचल्यानंतर अग्निशमन वाहन बंद पडल्याने आग नियंत्रणात आणण्यास अधिक विलंब झाला.या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, नगर परिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अग्निशमन विभाग हा अत्यंत संवेदनशील विभाग असून अशा परिस्थितीत प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. मात्र, जबाबदारीचे भान न ठेवता दाखविण्यात आलेला हलगर्जीपणा अक्षम्य आहे.त्यांनी पुढे म्हटले की, संदेश जोगदंड यांची कर्तव्याप्रती निष्काळजी भूमिका यापूर्वीही अनेकदा समोर आली आहे. वेळेवर घटनास्थळी न पोहोचणे, तसेच मोक्याच्या क्षणी वाहन बंद पडणे ही केवळ अकार्यक्षमता नसून कर्तव्यच्युती असल्याचा आरोप त्यांनी केला. या आगीत झालेल्या आर्थिक व इतर नुकसानीस संबंधित अधिकारी आणि कर्मचारी जबाबदार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नगर परिषद नियम व अधिनियमांनुसार संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, तसेच सखोल विभागीय चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.या प्रकरणात आता नगर परिषद प्रशासन कोणती भूमिका घेते आणि संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# 'वान अभयारण्य' बनले जड वाहतुकीचे कॉरिडॉर

## मेळघाटातील वन्यजीव धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ धारणी :**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अतिसंरक्षित वान अभयारण्यात सुरू असलेल्या जड वाहन वाहतुकीमुळे पर्यावरणप्रेमी आणि वन्यजीव अभ्यासकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोअर व्याघ्र क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संवेदनशील भागात मानवी हस्तक्षेप पूर्णतः प्रतिबंधित असतानाही तलई रेल्वे ते बारुखेडा व्हाया झरी मार्गे मोठ्या प्रमाणावर वाहने धावत असल्याची माहिती समोर आली आहे.वान अभयारण्य हे पट्टेदार वाघ, बिबट, अस्वल, सांबर, चितळ आणि रानगवे यांसारख्या दुर्मीळ वन्यजीवांचे सुरक्षित अधिवास मानले जाते. मात्र भरधाव वाहनांमुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक स्थलांतर मार्गांवर परिणाम होत असून रात्रीच्या हालचालींमध्ये व्यत्यय निर्माण होत असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. वाहनांचा आवाज, धूर आणि वाढलेली मानवी वर्दळ यामुळे



जंगलातील शांतता भंग होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.वन्यजीव अभ्यासकांनी या मार्गाचा वापर गोवंश तस्करी, अमली पदार्थांची वाहतूक आणि इतर अवैध कामांसाठी होत असल्याचा संशय व्यक्त केला आहे. मराठवाडा ते मेळघाट आणि पुढे मध्यप्रदेशातील खंडवा, बऱ्हाणपूरपर्यंत जाणाऱ्या संशयित नेटवर्कसाठी हा मार्ग सुरक्षित कॉरिडॉर ठरत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.विशेष म्हणजे, सुमारे दहा वर्षांपूर्वी वान अभयारण्यातील अनेक गावांचे पुनर्वसन करण्यात आले होते. तसेच ब्रिटिशकालीन नॅरोगेज रेल्वेमार्गही हटवून पर्यायी मार्गाने वळविण्यात आला होता. वन्यजीव संवर्धनासाठी शासनाने घेतलेल्या या निर्णयांनंतरही पुन्हा मानवी हस्तक्षेप वाढत असल्याने वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान, कोअर क्षेत्रातील सर्व अवैध मार्ग तातडीने बंद करून ड्रोनद्वारे निगराणी, संयुक्त तपास मोहीम आणि रात्री विशेष गस्त पथके नियुक्त करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

# लोकसहभागातून उभारलेला बस स्टॉप मनपाकडून जमीनदोस्त

## सातूर्णात नागरिकांचा संताप उसळला

### अतिक्रमण विभाग प्रमुखावर कार्यवाही करण्याची मागणी– चेतन गावंडे, सभागृह नेता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती शहरातील सातूर्णा परिसरात स्थानिक नागरिकांच्या लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या बस स्टॉपचे अमरावती महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने अचानक तोडकाम केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता करण्यात आलेल्या या कारवाईविरोधात स्थानिकांनी प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा निषेध व्यक्त केला असून संबंधित अतिक्रमण विभाग प्रमुखांवर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.प्रभाग क्रमांक १९ साईनगर–अकोली अंतर्गत सातूर्णा परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत लोकसहभागातून बस स्टॉप उभारला होता. परिसरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रोजंदारीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना उन्हाळा व पावसाळ्यात संरक्षण मिळावे या उद्देशाने हा बस स्टॉप उभारण्यात



आला होता. विशेष म्हणजे, बस स्टॉप उभारणीपूर्वी महानगरपालिकेच्या संबंधित विभागांकडून आवश्यक परवानग्या घेण्यात आल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. उपअभियंता कार्यालय, वाहतूक पोलीस विभाग तसेच अतिक्रमण विभागाची प्रक्रिया पूर्ण करूनच हे बांधकाम करण्यात आले होते, असेही सांगण्यात आले.मात्र, अचानक अतिक्रमण विभागाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून कोणतीही चर्चा किंवा नोटीस न देता बस स्टॉपचे तोडकाम केले. या घटनेनंतर परिसरात मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली असून नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. लोकांच्या पैशातून व सहकार्याने उभारलेली सार्वजनिक सुविधा पाडण्यापूर्वी प्रशासनाने किमान नागरिकांशी संवाद साधायला हवा होता, अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी दिली.या प्रकरणात सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन विजयराव गावंडे यांनी प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सर्व परवानग्या घेऊन उभारण्यात आलेल्या बस स्टॉपवर अशी कारवाई करणे म्हणजे नागरिकांच्या भावनांचा अपमान आहे. प्रशासनाने लोकसहभागाचा सन्मान राखला पाहिजे. अतिक्रमण विभागाचा हा मनमानी कारभार निषेधार्ह असून संबंधित विभाग प्रमुखांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात नागरिकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, अशी मागणीही गावंडे यांनी केली आहे. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त आणि संबंधित विभागांना निवेदन देण्यात आले असून नागरिकांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या घटनेमुळे मनपा प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा समोर आला असून, नागरिकांच्या सहभागातून उभ्या राहणाऱ्या विकासकामांबाबत प्रशासनाची भूमिका काय, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.